राज्यातील खाजगी अनुदानित / विनाअनुदानित
प्राथमिक,माध्यमिक,उच्च माध्यमिक शाळांच्या
स्थलांतराबाबत ...

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

## शासन निर्णय क्रमांकः माशास्थ-२०१२/(५९/१२)माशि २

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
तारीख: **३१ जुलै, २०१३**

**संदर्भ:**

१) **शासन निर्णय क्रमांकः** शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.माशास्थ-२००८/(८६०/०८)/माशि-१, दिनांक १७ फेब्रुवारी, २००९.

२) **शासन निर्णय क्रमांकः** शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.माशास्थ-२००८/(८६०/०८)/माशि-१, दिनांक ९ जून, २०१०.

**प्रस्तावना :**

राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना गुणात्मक व दर्जेदार शिक्षण देण्याची जबाबदारी शासनाची असल्याने महाराष्ट्र शासनाने सर्व दूरवर प्राथमिक व माध्यमिक शाळा उपलब्ध करुन दिल्या आहेत. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनामार्फत सध्या सुमारे १ लाख प्राथमिक व माध्यमिक शाळा सुरु असून त्यात सुमारे २.१७ कोटी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या १ लाख शाळांपैकी सुमारे ३२५७३ शाळा खाजगी आहेत. (अनुदानित २०,४५५ आणि विना अनुदानित १२,०१८).

२. खाजगी शाळा निरनिराळया कारणांस्तव एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी स्थलांतरित करण्यासाठी शासनाकडे विनंती अर्ज करीत राहतात. स्थलांतर योग्य रितीने व्हावे व विद्यमान विद्यार्थ्यांवर विपरीत परिणाम होऊ नये यासाठी शासनाने योग्य ते आदेश वेळोवेळी निर्गमित केले आहेत. तसेच माध्यमिक शाळा संहिता नियम क्र.७.६ मध्ये सुध्दा तरतूद करण्यात आली आहे.

२.१ असे असून सुध्दा बरेचसे संस्थाचालक मूळ उद्देश सादर न करता इतर कारणासाठी स्थलांतराची मागणी करित असतात. स्थलांतराची विनंती विद्यार्थ्यांची गरज

भागविण्यासाठी व त्यांचे हित जोपासण्यासाठी होणे आवश्यक आहे.

३. ६ ते १४ वर्ष वयोगटातील सर्व बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षण मिळावे यासाठी भारतीय घटनेमध्ये २००२ साली दुरुस्ती करण्यात आली असून हा त्यांचा एक मूलभूत अधिकार झाला आहे. या अनुषंगाने केंद्र शासनाने "बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण हक्क अधिनियम, २००९" पारित केला असून यांची अंमलबजावणी दि.१ एप्रिल, २०१० पासून करण्यात येत आहे.

४. या अधिनियमानुसार बालकांना नजिकच्या शाळा उपलब्ध करुन द्यावयाची आहे म्हणजे प्राथमिक शाळा १ कि.मी. उच्च प्राथमिक ३ कि.मी. व माध्यमिक शाळा ५ कि.मी. अंतरापर्यंत. या नियमाची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने सर्व शाळांबाबत गुगल नकाशावर नुकताच मॅपिंग करुन बृहत आराखडा तयार केला आहे व त्यानुसार मराठी माध्यमाचे शाळा उघडण्याचे आदेश पारित केले आहेत. अशा परिस्थितीमध्ये जर कोणतीही शाळा स्थलांतरित केली तर अधिनियम, २००९ चे उल्लंघन होण्याची शक्यता आहे.

४.१ या कायद्यांतर्गत बालकांना मोफत सक्तीचे व दर्जेदार शिक्षण द्यावयाचे आहे. म्हणून इतर नवीन शाळा इत्यादीमुळे सध्याचे स्थळी विद्यार्थी कमी होत आहेत, या सबबीवर विद्यमान विद्यार्थ्यांचे नुकसान करता येत नाही.शाळांनी आवश्यकतेप्रमाणे सुविधा व शिक्षणाच्या दर्जामध्ये वाढ करणे आवश्यक आहे.

५. "बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९" मधील तरतूदी लक्षात घेता स्थलांतराबाबत नव्याने आदेश पारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन आतापर्यंतचे सर्व आदेश अधिक्रमित करुन शासन पुढीलप्रमाणे नव्याने आदेश पारित करित आहे

## शासन निर्णय:

(१) खाजगी शाळांना (सध्या अस्तित्वात असलेल्या व नवीन मंजूर होणा-या) खाली नमूद केलेल्या पवादात्मक परिस्थिती सोडून इतर कोणत्याही कारणास्तव स्थलांतराची परवानगी देता येणार नाही:-

(i) शाळेची इमारत जीर्ण व धोकादायक किंवा नैसर्गिक आपत्तीमध्ये क्षतिग्रस्त झालेली असल्यास किंवा प्रकल्पामुळे बाधित होत असल्याने अशा शाळांमध्ये शिक्षण घेणे अशक्य.

(ii) सध्याच्या अपु-या इमारतीमधून स्वयंपूर्ण इमारतीमध्ये स्थलांतराचा प्रस्ताव.

(iii) सध्याच्या भाडयाच्या इमारतीमधून स्वत:च्या इमारतीमध्ये स्थलांतराचा प्रस्ताव इ.

(२) स्थलांतराची परवानगी देण्यापूर्वी खालील बाबींची पूर्तता होणे आवश्यक राहील:-

(i) अपवादात्मक परिस्थितीबाबत संबंधित सक्षम अधिकारी याचा दाखला.

(ii) ज्या ठिकाणी शाळा स्थलांतरित करावयाची आहे ती जागा पूर्वीच्या जागेपासून प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेकरिता अनुक्रमे १,३,५ व १० कि.मी.पेक्षा जास्त अंतरावर असू नये.

(iii) ज्या नवीन ठिकाणी शाळा स्थलांतरित करावयाची आहे तेथे इमारत (स्वत:ची किंवा भाडयाची) व इतर सर्व बाबी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ च्या निकषाप्रमाणे असणे आवश्यक राहील.**

(iv) शाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांना (कायम व तात्पुरत्या सेवेतील) स्थलांतरित ठिकाणी सामावून घ्यावे लागेल. तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांची कोणतीही पदवाढ मान्य केली जाणार नाही व कर्मचारी अतिरिक्त ठरल्यास त्यांना संरक्षण असणार नाही.

(v) शाळेस पटसंख्या/सरासरी हजेरी यामध्ये कोणतीही सूट दिली जाणार नाही.

(vi) स्थलांतराची परवानगी दिल्यानंतर त्याबाबतच्या अटी व शर्ती संस्था पूर्ण करीत नसल्याचे केव्हाही निदर्शनास आल्यास किंवा चुकीची माहिती सादर केल्याचे निष्पन्न झाल्यास स्थलांतराचे आदेश रद्द करण्यात येतील.

(vii) स्थलांतरापूर्वीचे ठिकाणी विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय झाली आहे याची खात्री करणे आवश्यक आहे.

(viii) अनुदानित शाळा स्थलांतरित होत असल्यास स्थलांतरापूर्वीच्या ठिकाणी अन्य अनुदानित शाळा उपलब्ध असावी.

(३) वरील अपवादात्मक परिस्थितीमध्ये शिक्षण अधिकारी यांनी तपासणी करून स्वयंस्पष्ट अहवाल विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेमार्फत शासनास सादर करावा. शासन सर्व बाबींचा विचार करून याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०७३११२२८३८८०२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prashant Suryakant Pradhan

Digitally signed by Prashant Suryakant Pradhan
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Prashant Suryakant Pradhan
Date: 2013.08.08 18:09:46 +05'30'

**(प्र.सू. प्रधान)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत,

१. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

२. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.

३. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.

४. सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषदा.

५. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषदा.

६. सर्व कार्यासने, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

७. निवड नस्ती (माशि-२).